**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


**प्रेसनोट क्र.११७ दि.१७/०१/२०२०**

वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर

## वानवडी पोलीसांनी सराईत गुन्हेगारास पकडुन २ किलो ३२९ ग्रॅम गांजा जप्त

दिनांक १४/०१/२०२० रोजी वानवडी पोलीस ठाणे कडील अधिकारी व कर्मचारी हे सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना पो.शि.नासीर देशमुख, पो.शि.नवनाथ खताळ, पो.शि.सुधीर सोनवणे, पो.शि.अनुप सांगळे, हे फिरत फिरत सय्यदनगर गल्ली नंबर ०२ जवळ आले असता सदर ठिकाणी एका मो.सा.वर दोन इसम संशयीतरित्या बसल्याचे व त्यांचे जवळ पांढ-या रंगाचे पोते असल्याचे दिसुन आल्याने सदर ठिकाणी गाडी थांबवुन अधिकारी व स्टाफ असे संशयीत इसमांकडे जात असताना ते पळुन जावु लागले असता त्यांना लागलीच स्टाफसह पकडुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपले नाव पत्ता (१) रिझवान महमद नसीर शेख वय २६ वर्षे धंदा नोकरी रा.गल्ली नं.८ बी चिंतामणी नगर साईनिवास बिल्डिंग तळ मजला हांडेवाडी रोड हडपसर पुणे (२) सलमान कलीम खान वय २७ वर्षे धंदा मजुरी रा.गल्ली नं.०३ सय्यदनगर शफी इमानदार बिल्डिंग चौथा मजला महंमदवाडी रोड हडपसर पुणे असे असल्याचे सांगुन त्यांचेकडील पांढ-या रंगाचे पोते ताब्यात घेवुन ते उघडुन त्यामध्ये गांजा असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना ताब्यात घेवुन वानवडी पोलीस ठाणे येथे आणले. तसेच त्यांचेकडुन एकुण २ किलो ३२९ ग्रॅम गांजा व एक मोटार सायकल असा एकुण ५०,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही श्री सुनिल फुलारी सो, अप्पर पोलीस आयुक्त पुर्व विभाग, पुणे शहर, श्री सुहास बावचे सो, पोलीस उप-आयुक्त परिमडळ ५, पुणे शहर, श्री सुनिल कलगुटकर, सहा. पोलीस आयुक्त वानवडी विभाग, पुणे शहर, यांचे सुचनेनुसार श्री क्रांतीकुमार पाटील, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर, श्री सलीम चाऊस, पोलीस निरीक्षक (गुन्हे), वानवडी पोलीस ठाणे पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक श्री अंकुश डोंबाळे, सहा.पो. फौज.रमेश भोसले, पो.शि.महेश कांबळे, यांचे पथकाने केली आहे.